
# अस्वस्थ करणारी पुस्तके




मीरा कुलकर्णी

# अस्वस्थ करणारे पुस्तक. .१

***In the Name of Honor: A Memoir***

Mukhtar Mai (Author), Linda Coverdale (Translator),

icholas D. Kristof (Foreword), Marie-Therese

Cuny (Contributor)

Publisher: Washington Square Press; Language: English

मीरा कुलकर्णी

ई साहित्य प्रतिष्ठान

# अस्वस्थ करणारे पुस्तक १

*In the name of Honour*

*By Mukhtar Mai*


## मीरा कुलकर्णी

B 12, Gera Greens,NIBM Road

Pune 411048

Mob: 8380801000

kulkarni.meera@gmail.com



प्रकाशक: ई-साहित्य प्रतिष्ठान

वेब: www. esahity. com

ईमेल esahity@gmail. com


प्रकाशन : २३ नोव्हेंबर २०१४



©esahity Pratishthan® 2014

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

# भूमिका . .




*हे पुस्तक साधारणतः ७-८ वर्षांपूर्वी वाचले होते. तेव्हा सवयीनुसार मनाला भावलेल्या गोष्टींमधे आपसूकच त्याची आठवण जपली गेली. काही टिपणवजा लिखाण पण केले होते. पण तेवढयावर मुख्तारमाईने विस्मरणात जाणे मान्य केले नाही. तिच्या पुढील आयुष्याबद्दल, कार्याबद्दल इंटरनेटवर वाचत राहिले. आपल्या सुरक्षित आयुष्यात एखादी जरी विसंगत घटना घडली तरी आपण उन्मळून पडतो. तिचा अवकाश तिने जिद्दीने केवढा विस्तारला अन् आज जेव्हा आजुबाजूला त्याच निर्घृण अत्याचाराची शिकार होत असणारी अबला दिसतेय तेव्हा हे पुस्तक प्रथम वाचतांना जी अस्वस्थता जाणवली होती ती प्रकर्षाने वाढतेय. म्हणून हा समभाविकांना साद देण्याचा यत्न.*

*"बाबा"*

*. . माझे वडिल कै. डॉ. ब. वा. कुलकर्णी . .*

*यांनी फार मोठा संस्काराचा वारसा आम्हा मुलांना दिला.*

*ह्या संस्कारांमुळेच समस्त स्त्रीवर्गाबद्दल त्यांना नितांत आदर होता*

*व समाजानेही तसेच करावे अशी आग्रही भूमिका होती.*


*परिचयातील प्रत्येक लेकीसुनेला हा आपल्या मनातली वेदना जाणणारा माहेरचा सगाच वाटे.*

*कोणत्याही प्रकारच्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी स्त्रियांनी स्वतः*

*सक्षम बनलेच पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते.*

*ही त्यांना आदरांजली.*

*. . मीरा*



आतंकाच्या कुठल्या सीमा असतात? अत्याचार सहन करणाऱ्या कोणत्या मर्यादा असतात? त्याविरूध्द लढण्यासाठी किती ताकद लागते? पिढयान्‌पिढया दबल्या गेलेल्या दुबळया समाजाला कोणती शक्ती आत्मविश्वास देते? मुळात अशा पीडित व्यक्तींकडून अन्यायाविरूध्द उभे रहाण्याची अपेक्षा सफल होते का?

अशा असंख्य प्रश्नांचे सनातन भुंगे मनात सतत घोंगावत असतात. त्यांची उत्तरें इतिहास नेहेमी ढुंढाळत असतो. व्यक्ति, जाती-जमाती गावें अन् देश सुद्धा अशा अत्याचारांखाली होरपळून नष्ट झालेले आढळतात. पण त्याविरूद्ध बंडाचा झेंडा फडकवणाऱ्या व्यक्ती-शक्तींचे काय होते? होतात का त्या यशस्वी? कि त्यांचाही नामोनिशाणा उरत नाही?

ह्या सवालांचा वेध घेणाऱ्या बऱ्याच साहित्यकृती आजवर प्रसिद्ध झाल्या आहेत. वाङमयीन मूल्यापेक्षा कथामूल्यतेच्या कठोर सत्यतेमुळे त्या अधिक परिणामकारक झाल्या आहेत. निवेदनातील प्रामाणिकता व भोगलेल्या दुःखांची नेमकी कहाणी मनाला जास्त भिडते. याच परंपरेतील एक लक्षवेधी पण अस्वस्थ करणारे पुस्तक आहे ***"इन द नेम ऑफ ऑनर"***.

भारताच्या सरहदीनजिक , पाकिस्तानमधे दक्षिण पंजाबमधील मरिवाला या लहानशा खेडयात रहाणाऱ्या '***मुख्तरन बीबी*** 'ह्या ३०-३२वर्षे वयाच्या एका ग्रामीण स्त्रीचे असेच हादरवून सोडणारे हे आत्मकथन आहे .

२१व्या शतकातील घृणास्पद अत्याचाराची बळी ही मुख्तारमाई . तिने न केलेल्या गुन्ह्याची शिक्षा तिला प्राचीन सरंजामशाही समाजपद्धती पाळणाऱ्या एका क्रूर जमातीत मिळते काय अन् तिचे सारे जीवन एखाद्या दोर तुटलेल्या पतंगासमान भिरभिरत राहते . गावच्या पंचायतीद्वारा तिच्यावर सामुहिक बलात्कार करण्याचा हुकुम फर्मावला जातो . त्या अत्याचारात ती राख होऊन कोसळते .

आधीच अशिक्षित अन् बाह्यत: असहाय अशी ही पीडित अबला, पण धैर्याने त्याच राखेतून पुन्हा उभी राहते . अशा असंस्कृत व जुनाट रूढींमध्ये अडकलेल्या समाजातील व देशातील पण पहिली बंडखोर स्त्री बनते . आपल्या आत्मसन्मानासाठी, गेलेली 'इज्जत' परत मिळवण्यासाठी घृणास्पद रूढींच्या विरूद्ध उभं ठाकून झगडणाऱ्या एका सबलेची ही कहाणी आहे .

काही झोपडयांची वस्ती म्हणजे तिचे गाव . इतरत्र असते तसे इथे पण मूठभर श्रीमंतांचे व उच्च जातीचे प्राबल्य . खालच्या जातींवर त्यांची सततची दहशत व घडणारे अमानुष अन्याय . अशा शोषित गुजर समाजातील ही एक सर्वसाधारण स्त्री . गुलाम फरीद जाट यांची सर्वात मोठी मुलगी . लहानपणापासून फक्त घरकामच शिकवली गेलेली . मोठयांना उलट उत्तर

द्यायचे नाही. नजर उचलून बघायचे नाही. मुलांशी तर अजिबात बोलायचेही नाही. पण कानावर पडल्यामुळे कुराण पाठ झालेले.



वडिलांच्या घरात स्त्रियांचे माजघरापुरते विश्व असलेली. तिची भातुकली पण मोठया माणसांचे अनुकरण करून तेच संसाराचे खेळ खेळणारी. बाहेरच्या जगातच नव्हे तर बाहेरच्या खोलीत पुरूषांच्या जगात काय घडतय त्याची जाणीव नसणारी. कारण तशी प्रथाच नाही !

मुलींना शालेय शिक्षणापासून वंचित ठेवणारी. केवळ घर, गुरे-ढोरें, व शेतीतील कामेच करणे पण वास्तवात त्यांच्यापेक्षाही कमी सामाजिक दर्जा बहाल करणारी ही जुनाट परंपरा. अन् त्याचीच ही मुख्तार माई बळी. आपला जीवनसाथी निवडणे तर दूरच पण तो कोण कसा असेल हे देखिल माहित करू न देणारी ही समाजव्यवस्था.


त्यामुळे जेव्हा एका नालायक व आळशी माणसाबरोबर निकाह लावून दिला जातो व सासरी होणारा छळ असह्य होतो तेव्हा वडिलांच्या पाठिंब्याने 'तलाक' घेऊन माहेरी परतते. माहेरच्या उपकारांची परतफेड आपल्या अथक कष्टांमधून करणारी. पण त्याच बरोबर गावातील मुलींना कुराण व बायकांना भरतकाम शिकवून आत्मसन्मान राखणारी.

अशा महिलेच्या जीवनात २२ जून २००२ रोजी एका प्रचंड वादळाची सुरूवात होते. शकूर ह्या तिच्या १०-१२ वर्षे वयाच्या भावाने म्हणे मस्तोई ह्या उच्च जातीतील सलमा नावाच्या मुलीशी बोलण्याचे धाष्टर्य केले म्हणजे त्यांच्या पंचायतीच्या 'कायद्यानुसार' छेडच काढली. ही सलमा विशीच्या पुढची तरूणी होती. त्या 'गुन्ह्याची' शिक्षा म्हणून त्याला पळवून नेऊन मारहाण व अनन्वित अत्याचार केले गेले व पोलिस कोठडीत डांबले गेले.

पण रानटी टोळयांचा निवाडा सुसंस्कृत जगाच्या न्यायासारखा नसतो. मस्तोई टोळीची गेलेली 'इज्जत' परत मिळवण्याचा मार्ग फक्त गुजर स्त्रियांची 'इज्जत' लुटणेच असतो. जेव्हा कुठल्याही छोटया-मोठया गुन्ह्यासाठी खालच्या जमातीला शिक्षा द्यावयाची असते तेव्हा जमीन-जुमला व बायकांचाच वापर करण्याचा प्रयत्न होतो. ग्रामपंचायतीत पण मस्तोई कबिल्याचे प्राबल्य असते. जेव्हा समजुतीचे सगळे प्रयत्न असफल ठरतात तेव्हा एकच मार्ग उरतो. तो म्हणजे एखाद्या गुजर स्त्रीने त्या भडकलेल्या जमावापुढे पदर पसरून माफी मागणे. या कामासाठी निवड होते मुख्तारबीबीची.

*"मी च का ?"*

या मुख्तारबीबीच्या प्रश्नाला उत्तर मिळते की,



*“तू मोठी आहेस. बाकीच्या तुझ्यापेक्षा लहान आहेत. शिवाय तू परित्यक्ता आहेस. नवऱ्याने तुला सोडलंय. तुला मूलबाळ नाही. त्यामुळे आपल्या घरातील इतर सर्व बायकांमधून आम्ही तुलाच निवडलय.”*

असे अजब तर्कशास्त्र !

तिला अजूनही हे वादळ कशातून उद्‌भवलय ह्याची काहीच कल्पना नाहीय. हातात कुराण घेऊन ती घरातल्या लोकांच्या हुकुमाप्रमाणे मस्तोईच्या वस्तीत सगळया गावाबरोबर जायला निघते. ह्या छोटया दिसणाऱ्या परन्तू तिचे पुढील सगळ आयुष्य उध्वस्त करणाऱ्या प्रवासात तिची ताकद असते तिचे कुराण व आपण काही ‘गुन्हा’ केलेला नाही असा भाबडा विश्वास. आपल्या सग्यांचा ‘सन्मान’ परत मिळवून देण्यासाठी गेलेली जणु एक वीरांगना !

पण लवकरच सगळे धुळीला मिळते. पुढे जे काही घडत जातं त्यावर तिचा स्वतःचाच विश्वास बसण कठीण होत जातं. ते संपूर्ण निवेदन निर्जीव व एकसुरी भाषेत येतं इथे.

जनावरांच्या गोठयात खेचत नेऊन मस्तोई जमावाकडून पाशची बलात्कार झाल्यानन्तर अर्धनग्नावस्थेत तिला बाहेर फेकून देण्यात येते. काळोखात आपले शरमलेले चेहेरे लपवून

तिच्या जमातीचे 'मर्द' बसुन असतात. बाप आपल्या त्या अर्धमेल्या मुलीला आपल्याच चादरीत गुंडाळून घरी घेऊन येतो.




इतक्या नीच पातळीवरील पाशवी अत्याचाराची बळी झालेल्या तिनेच आपले जीवन संपवावे अशी भोवतीच्या समाजाची अपेक्षा असते. अशा 'बेइज्जत' बाईने काय जगायचं ?

पण ती चिडून उठते अन् तिथून लढा सुरू होतो अन्यायी व जुलमी जातीव्यवस्थेविरूद्ध . भ्रष्ट राज्यव्यवस्थे विरूद्ध. गुन्हेगारांना कडक शासन व्हावे म्हणून. पुन्हा असला हिडिस अत्याचार कुणावर होऊ नये म्हणून.

२२जून २००२ला हा सामुहिक बलात्कार होतो. अपरात्री तिच्या अल्पवयीन भावाला सोडून देण्यात येते. शुक्रवारच्या नमाजात इमाम या घटनेची निंदा करतात व एका स्थानिक पत्रकाराची मुख्तरणच्या वडिलांशी भेट घडवून आणतात. त्याच बरोबर मुख्तरणला बलात्कार करणाऱ्यांविरूद्ध पोलिसठाण्यात तक्रार करण्यास प्रोत्साहित करतात. त्यामुळे धीर येऊन मुख्तारमाई ३० जूनला जटोई पोलिसठाण्यात तक्रार नोंदवते. पुढील काही दिवसात पाकिस्तान

मधील प्रसारमाध्यमांमध्ये ही मुख्य मथळयाची बातमी बनते व कित्येक महिने तशीच प्रकाशझोकात राहते.

३जुलैला ही बातमी बी. बी. सी. वरून प्रसारित झाली. जुलैच्या मध्यात 'टाईम' मासिकात यावर एक महत्वपूर्ण लेख प्रसिद्ध झाला. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील बहुतेक सर्व प्रसिद्धीमाध्यमे ह्या केसमधील ताज्या घडामोडींना सतत बातम्यांच्या द्वारे जगापुढे ठेवत राहिली.




ह्या पुस्तकात मुख्तारमाई या लढयाचे सविस्तर वर्णन करते. जुलै मधेच पाकिस्तानी न्यायव्यवस्थेतील चीफ जस्टिसद्वारा या घटनेला

*'२१व्या शतकातील सर्वात घृणास्पद घटना '*

असे संबोधून ह्या केसच्या गलथान हाताळणी बद्दल संबंधित वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांवर खरमरीत ताशेरे ओढले आहेत.




COURTESY MUKHTAR MAI WOMEN'S ORGANISATION


WE ARE UNITED (PUJ)
DON'T PRESS MEDIA (PUJ)
WE ARE UNITED (PUJ)

ही आत्मकथा केवळ अन्यायाचे वा बलात्काराचे वर्णन करणारी सनसनाटी गोष्ट नाही. तर एका जीवनध्येयावर निघालेल्या अडाणी अशिक्षित अबलेच्या प्रचंड धैर्याची व ठाम निग्रहाची वाटचाल वर्णन करणारी गाथा आहे. सर्वत्र नकारात्मक परिस्थितीमुळे तिला न्यायाच्या लढाईत फार दु:ख व मनस्ताप सहन करावा लागला. ज्या घटनेचा जवळजवळ सर्व गाव साक्षी होता तिथे कोर्टात साक्ष देण्यास कोणीच धजावले नाही. मात्र जी अबला स्वतः 'ऑनर' च्या अन्यायकारी रूढीची बळी ठरली ती आज सबंध जगापुढे आदर्श ठरली आहे तिच्या लढयामुळे ! ग्रामीण व अशिक्षित महिलांना शिक्षित व सक्षम बनविण्यासाठी तिने केलेल्या अथक प्रयत्नांमुळे ! मुळाक्षरेही न वाचता येणारी ही अबला कुठल्याही दबावाला न शरण जाता '*शिक्षणाचा जोमदार प्रवाहच ही सरंजामी व अत्याचारी प्रवृत्ती बदलू शकेल* ' या दुर्दम्य विश्वासाने ५ जुलैला मिळालेल्या ५००,०००रू. च्या सरकारी मदतीतून तिच्याच गावात मुलींसाठी एक शाळा सुरू करते. आणि विशेष बाब की तिच्यावर अत्याचार करणाऱ्या मस्तोई जमातीची मुले पण त्याच शाळेत येतात.

"*मुलींच्या शिक्षणाद्वारे समाजाला स्त्री-हक्क व लिंगभेदाधारित समस्या बद्दल सज्ञान करणे* " हेच तिचे ध्येय ठरले.

एका सडलेल्या समाजव्यवस्थेशी लढणे सोपे कधीच नव्हते. पण ह्या लढयाची ठिणगी तिच्या अशिक्षित आईच्या उद्गारांनी पडली

"*ही लढाई तुझा हक्क आहे. अन् कोणीतरी पावसाचा पहिला थेंब व्हावच लागतं!*"

आणि ही कन्या तर वादळच ठरली.




ज्या देशात दर दोन तासांनी एका महिलेवर बलात्कार होतो आणि 'ऑनर किलिंग' पायी दर दिवशी २ स्त्रियांचा बळी जातो त्या समाजाला व जगालाही तिने 'ऑनर' चा खरा अर्थ आपल्या लढयातून दाखवला.

एका साधारण स्त्रीने करून दाखवलेले 'असाधारण' कार्य साध्या सरळ शब्दांत सांगणारे हे एक छोटेसेच पुस्तक आहे पण खपाचे अनेक उच्चांक साधलेले. पुस्तकाची भाषा थेट हृदयाला भिडते. त्यात कुठलाही कृत्रिम अभिनिवेश नाही. अतीव दु:खे भोगून जणू आता ती थिजून कोणा तिसऱ्याच व्यक्तीबद्दल बोलतेय ! मूळ निवेदन जरी तिने आपल्या मायबोलीत






केलेले असले तरी ते आधी फ्रेंचमधे प्रकाशित झाले व आपल्यापर्यंत हे इंग्रजीत अनुवादित पुस्तक पोहोचले आहे. पण या प्रवासात तिच्या भावनांमधली सच्चाई वा निवेदनातील थेट भिडणारा साधेपणा जराही हलला नाही. तिरस्कार , हिंसाचार किंवा शक्ती वा प्रेम ह्या सारखे प्रवळ मनोभाव मुख्तारमाई कुठलाही भडकपणा न आणता अत्यंत प्रभावीपणे मांडते की वाचकांच्या अंतर्मनात त्यांचे प्रतिध्वनी सहज उमटावेत. ही लढाई एकांडया रणरागिणीने सुरू केली पण आज तिच्याबरोबर सारी दुनिया ठाकली आहे. तिला मिळालेले असंख्य पुरस्कार याची ग्वाही देतात. कारण त्यातला लढा सर्व जगाला व्यापणारा ठरतो आहे.

International Association of Human Rights,

Canadian International Development Agencies,

स्त्री हक्काबाबत कार्यरत असणाऱ्या पाकिस्तान मधील बऱ्याच संघटना, स्त्रियांवरील अत्याचाराविरूध्द काम करणाऱ्या असंख्य जागतिक संस्था व काही प्रमाणात पाकिस्तानी न्यायव्यवस्था अशा अनेक देशी–विदेशी व जागतिक संस्था संघटना तिच्या ह्या अन्यायाविरोधातील लढयात तिला बळ दिले.

मुख्तारमाई च्या कार्यावर 'लॅंड, गोल्ड ॲंड विमेन' हा माहितीपट बनविण्यात आला . पाकिस्तान सरकारने स्त्रियांसाठी असलेले 'फातिमा जिना शौर्यपदक' तिला २००५ मध्ये बहाल केले. अमेरिकेच्या 'ग्लॅमर' मासिकाने तिचा विशेष सन्मान केला. U.N. मधे तिला भाषणाची संधी मिळाली. मानवी हक्कांसाठी लढा दिल्याबद्दल युरोपियन कौन्सिल ने २००६ मधे तिला 'नॉर्थ साऊथ' पुरस्कार दिला गेला. २००५मधे पाक सरकारला तिचा जप्त केलेला पासपोर्ट एका आठवडयातच परत करावा लागला. व अखेर मुख्तारमाईच्या संघर्षामुळे पाकिस्तान संसदेत २००६ मधे ठराव पारित करून तेथील सरकारला स्त्रियांच्या हक्काचा कायदा अंमलात आणावा लागला.

‘हार्ट ऑफ गोल्ड ॲन्ड विल ऑफ स्टील’ यासम अनेक भूषणांनी गौरवलेल्या मुख्तारमाईची जीवनकहाणी नवसुधारणेच्या मार्गावर चालणाऱ्या समस्त देशांना आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडते. गेल्या दशकात समाजातील दुर्बल घटकांवरील, विशेषत: स्त्रियावरील अत्याचारांमुळे शब्दात वर्णन न करतायेण्याजोगी उद्विग्नता व संताप वाढतो आहे.




काही वर्षांपूर्वी असा भ्रामक समज करून स्वतःचे खोटे समाधान आपण करित होतो की

...अशा प्रकारची लिंगभेदावर वर्ण–जातीभेदावर द्वेषाची पाळेमुळे आपल्या भवतालातून नाहीशी होताहेत !!!

... शिक्षणप्रसारासोबत सरंजामशाहीची रक्तखूण मिरवणारी पुरूषी अरेरावी व अन्यायी जुनाटवृत्ती आपल्या समाजात खूप मोठया प्रमाणावर आता नाही आढळत !!!

...अशा दुर्भागी घटना अजब सामाजिक व नैतिक मूल्ये बाळगणाऱ्या काही विवक्षित भूभागामधे सर्रास घडताात व तो तेथील दुराग्रही समाजपुरूषाचा हिंसाचार आहे !!!

. . . आपण तर सुधारक आहोत !!!

...आपला सांस्कृतिक व वैचारिक वारसा आणि आधुनिक वर्तमान

फारच उज्ज्वल आहे !!!

...पण नाही !

इतक्या प्रचंड वेगाने मोकाट सुटलेला हा भस्मासूर आपल्या समाजाला पण विळखा घालून बसलाय.

कदाचित माणसाचा माणूस असणे हाच आजमितीला गुन्हा ठरतोय.

"I am fighting a fight against oppression where the poor and women are being violated,"

"This award is a victory for poor women; it's a victory for all women, ... End oppression with education."

- Mukhtar Mai



"

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही व्यावसायिक प्रकाशन संस्था नाही. काही सामाजिक ध्येय डोळ्यांसमोर ठेवून मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांच्यासाठी ही तरुणांची संस्था काम करते आहे.

ई साहित्य प्रतिष्ठानच्या पुस्तक खजिन्यात सातत्याने नवनवीन भर पडत असते. आपण पहाता ना? २०१४ मध्ये सुमारे शंभर ई पुस्तके आम्ही प्रकाशित केली. नवीन खूप सारी पुस्तकं लवकरच येत आहेत. एकाहून एक भारी. सगळीच तुम्हाला हवी असतील तर संपर्कात रहा. VIP सभासद बना.

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे. आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं.

1. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचं पुस्तक ईमेलवरसर्वातआधी मिळतं. त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमाचं आमंत्रण मिळतं. त्यांच्या भावी योजनांची माहिती मिळते. त्यांच्या कामात स्वतः सहभागी होण्याची संधी मिळते.

2. ज्या दहा किंवा अधिक मित्रांना तुमच्यामुळे फ्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं मिळाली की ते इतर लोकांना तुमच्याबद्दल सांगतात. त्यांच्यासाठी तुम्ही म्हणजेच ई साहित्यचे प्रतिनिधी बनता.

3. आणि यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आमचा उद्देश आहे मराठीतल्या सहा कोटी साक्षरांना वाचक बनवणं. आणि हे लक्ष्य साध्य करणं हे केवळ आणि केवळ मराठी लोकांना त्यांच्या भाषेवर असलेल्या प्रेमातूनच शक्य आहे. आपल्या भाषेचं राज्य व्हावं म्हणून १०६ हुतात्मे झाले. आपल्या भाषेनं राजा व्हावं म्हणून आपण एक दहा-वीस ई मेल आयडी देणारच ना!

वाचनाची आवड असो वा नसो. फ़क्त मराठी साक्षर अशा दहा लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांना वाचनाची आवड आपोआप लागेल. आपणच लावू. लावूच लावू. करूनच दाखवू.

आहे ना : एक दम : तीन काम.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

www.esahity.com या वेबसाईटला भेट द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र
टीम ई साहित्य प्रतिष्ठान